महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

---

**क्र. पी.आर-३/सबसिडी/ ६८०० ०** **दिनांक :५.३.२०१३**

**वाणिज्य परिपत्रक क्र. १८८**

**विषय :-** यंत्रमागधारकांना पूरविण्यात येणा-या शासनाच्या सवलतीच्या वीजदरात सुधारणा करणेबाबत.

**संदर्भ :-** १) शासन निणय क्र. विपुअ-२०१२/प्र.क्र.९१/ऊर्जा-३ दिनांक ११/१०/२०१२.
२) वाणिज्य परिपत्रक क्र. १८१ दि. १२.१२.२०१२.
३) शासन निर्णय क्र. टॅरिफ-२०१२/प्र.क्र.९१/भाग-२/ऊर्जा-३ दि.५.३.२०१३.

संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयानुसार शासनाने यंत्रमागधारकांना पुरविण्यात येणा-या शासनाच्या सवलतीच्या वीज दरामध्ये सुधारणा केलेली होती. सदर सुधारीत सवलतीचे दर १ ऑगस्ट २०१२ पासुन लागू करण्यात आलेले होते. सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सदर बाबतीत वाणिज्य परिपत्रक क्र. १८१ दि. १२.१२.२०१२ अन्वये कळविण्यात आलेले होते.

शासनाने संदर्भ क्र. ३ मधील शासन निर्णयानुसार पुन्हा एकदा यंत्रमागधारकांना पुरविण्यात येणा-या सवलतीच्या दरामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा केलेली आहे. सदर सुधारीत सवलतीचे दर दि. १ फेब्रुवारी २०१३ पासून यंत्रमागधारकांना लागू होतील.

अ) उच्चदाब (कन्टीन्युअस व नॉन- कन्टीन्युअस) यंत्रमाग धारकांच्या सध्याच्या सवलतीच्या दरामध्ये वाढ करुन त्यांना रु.५.६६ प्रति युनिट असा सवलतीचा दर आकारण्यात यावा.

ब) २७ अश्वशक्तीपेक्षा कमी जोडभार असणा-या व २७ अश्वशक्तीपेक्षा अधिक जोडभार असणा-या लघुदाब यंत्रमागधारकांना रु.२.५७ प्रति युनिट असा समान वीजदर आकारण्यात यावा.

क) उच्चदाब यंत्रमागधारकांना तसेच दोन्ही प्रवर्गातील लघुदाब यंत्रमाग धारकांना संदर्भ क्र. २ मधील वाणिज्य परिपत्रक क्र. १८१ नुसार वाढीव स्थिर आकार व इंधन समायोजन आकार भरावा लागेल.

ड) भविष्यात मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वेळोवेळी मंजुर केलेला वाढीव वीज दर (स्थिर आकार व वीज आकार) यंत्रमागधारकांनी भरणे बंधनकारक राहील.

ई) वरीलप्रमाणे सवलतीचे दर दिनांक १ फेब्रुवारी २०१३ पासून अंमलात येतील.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते की, वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

[signature]
**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत माहितीस रवाना :**
मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान)
-- वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने यंत्रमाग ग्राहकांच्या देयकाच्या सगणक प्रणालीमध्ये आवश्यकते बदल करण्यात यावेत.

**प्रत रवाना :- प्रेषण यादिप्रमाणे**